CIDCO
WE MAKE CITIES

आपलं महानगर मुंबई : सोमवार ३ फेब्रुवारी २०२५

# नवी मुंबईतून पहिले टेक ऑफ मेअखेरीस

## व्यवस्थापकीय संचालकांकडून कामाचा आढावा



**नवी मुंबई :** ग्रीन फिल्ड नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. यंदा मे अखेरीस या विमानतळावरून पहिल्या विमानाचे उड्डाण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी विमानतळाच्या कामाचा आढावा घेतला आहे. शुक्रवारी विजय सिंघल यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची पाहणी केली. त्यांच्यासोबत शांतनु गोयल (सहव्यवस्थाकीय संचालक), गीता पिल्लई (मुख्य महाव्यवस्थापक-परिवहन व विमानतळ) आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे टी२ टर्मिनल २०२९ मध्ये पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल. त्यानंतर प्रवासी वाहतूक अधिक सुव्यवस्थित होईल आणि मुंबईसाठी नवे हवाई दळणवळण केंद्र उभारले जाईल. त्यामुळे महाराष्ट्राला एक नवे जागतिक दर्जाचे विमानतळ मिळणार आहे. या पाहणी दौऱ्यात विजय सिंघल यांनी प्रकल्पाच्या एकूण प्रगतीचा आढावा घेऊन सर्व कामे मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश संबंधितांना दिले.

CIDCO
WE MAKE CITIES

**लोकमत** सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५

मस्ट READ

# विमानाच्या टेकऑफसाठी एरोड्रोम परवान्याची प्रतीक्षा

**कमलाकर कांबळे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** देशातील पहिले ग्रीन फील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ नवी मुंबईत उभारले जात आहे. हे विमानतळ व्यावसायिक वापरासाठी खुले करण्यासाठी एरोड्रोम परवाना आवश्यक आहे. त्यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे अर्ज केला जाणार आहे. तत्पूर्वी एरोनॉटिकल इन्फॉर्मेशन पब्लिकेशनमध्ये विमानतळाविषयीचा संपूर्ण तपशील प्रसिद्ध केला जाणार असल्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी स्पष्ट केले


नवी मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून विमानतळाचा विकास केला जात आहे. या प्रकल्पावर नोडल एजन्सी म्हणून सिडको काम करत आहेत. गेल्या वर्षभरात आवश्यक अनेक चाचण्या करण्यात आल्या आहेत. विमानाचे टेकऑफ आणि लँण्डिंगचीही चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार १७ एप्रिलपासून नवी मुंबई विमानतळ व्यावसायिक वापरासाठी खुले करण्याची योजना आहे. या पार्श्वभूमीवर विजय सिंघल विमानतळाच्या कामावर लक्ष ठेवून आहेत. शनिवारी त्यांनी विमानतळ प्रकल्पाला भेट घेऊन

## डेडलाइन पाळणार

विमानतळाच्या उद्घाटनाची डेडलाइन हुकणार नाही, यादृष्टीने शिल्लक कामांना गती देण्याच्या सूचना केल्या. एकूणच कामाची गती समाधानकार असून येत्या आठवड्यात एरोनॉटिकल इन्फॉर्मेशन पब्लिकेशनमध्ये विमानतळाचा तपशील प्रकाशित केला जाणार आहे. त्यानंतर लगेच एरोड्रोम परवान्यासाठी अर्ज केला जाणार असल्याचे सिंघल यांनी 'लोकमत'ला सांगितले.

## एआयपी, एरोड्रोम परवाना का महत्त्वाचा?

१ विमान वाहतूक सेवा सुरू करण्यासाठी एरोनॉटिकल इन्फॉर्मेशन पब्लिकेशनमध्ये विमानतळाचा तपशील, क्षमता, पार पडलेल्या चाचण्या, विमानाच्या सुरक्षेवर परिणाम करणारे घटक, ज्या देशांमध्ये विमान वाहतूक सेवा सुरू करायची त्याची माहिती हवाई नेव्हिगेशनसाठी आवश्यक असलेला तपशील समाविष्ट केलेला असतो.




२ ही माहिती भारतीय विमान प्राधिकरणाच्या माध्यमातून यात प्रकाशित केली जाते. त्यानंतर ७० दिवसांनी विमान वाहतूक सेवा सुरू करण्याचा परवाना प्राप्त होतो. त्यासाठी एरोड्रोम परवाना घेणे आवश्यक असते.

३ नवी मुंबई विमानतळावरून प्रवासी वाहतूकसेवा सुरू

CIDCO
WE MAKE CITIES

सोमवार 3 फरवरी 2025 **हमारा महानगर**

## प्रकल्पग्रस्तों के निर्माण कार्यों का पुनः सर्वेक्षण

# सिडको मंडल ने दी 55 करोड़ रुपए की मंजूरी

**नवी मुंबई।** नवी मुंबई में प्रकल्पग्रस्तों द्वारा बनाए गए घरों के नियमितीकरण को लेकर राज्य सरकार ने विधानसभा चुनावों से पूर्व एक निर्णय लिया था,- जिसके तहत आवश्यकतानुसार बनाए गए घरों को नियमित करने की योजना बनाई गई थी। हालांकि, आदेश जारी होने के तीन महीने बाद भी इस दिशा में प्रगति बहुत कम हुई थी। अब सरकार ने इन निर्माण कार्यों का पुनः सर्वेक्षण करने का फैसला लिया है, जो इस बार जिओ मैपिंग के माध्यम से किया जाएगा। सिडको ने इसके लिए 55




करोड़ रुपए की निविदा जारी की है और यह कार्य जल्द शुरू होने की संभावना है। नवी मुंबई के 95 गांवों के गांवठाण और विस्तारित गांवठाणों में किए गए अनधिकृत निर्माणों का जिओ मैपिंग के माध्यम से सर्वेक्षण किया जाएगा।

इस प्रक्रिया से यह सुनिश्चित होगा कि प्रकल्पग्रस्तों द्वारा बनाए गए घरों के नियमितीकरण की प्रक्रिया आगे बढ़ सके। सर्वेक्षण के लिए तीन कंपनियों ने निविदा भरा हुआ है,जिसमे पायोनियर फाउंडेशन इंजीनियरिंग प्रा. लि., मोनार्च सर्वेअर्स एंड इंजीनियरिंग कंसल्टेंट लि., और सी. ई. इंफो सिस्टम लि. का समावेश है सिडको के प्रबंध निदेशक विजय सिंघल ने निर्देश दिया है कि यह सर्वेक्षण कार्य केवल जिओ मैपिंग में अनुभव रखने वाली कंपनियों को ही सौंपा जाए।

CIDCO
WE MAKE CITIES

सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ सामना

# सिडकोची इमारत बांधून पूर्ण; आता हस्तक्षेप शक्य नाही

## खांदेश्वर, मानसरोवर प्रकल्पाला आक्षेप घेणारी याचिका फेटाळली; हायकोर्टाचा सिडकोला दिलासा

मुंबई, दि. २ ( प्रतिनिधी ) - मानसरोवर, खांदेश्वर येथील कांदळवनांच्या जागेवर सिडकोने इमारत उभारली असा दावा करत उच्च न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या कामोठे येथील एका संघटनेला दिलासा देण्यास हायकोर्टाने नकार दिला. सिडकोची इमारत बांधून पूर्ण झाली आहे. आता हस्तक्षेप शक्य नाही, असे स्पष्ट करत मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने सदर याचिका फेटाळून लावली. त्यामुळे सिडकोच्या भव्य गृहनिर्माण योजनेचे काम सुरळीत पार पडणार आहे.



न्यायालय काय म्हणाले...

- सीआरझेड तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून यापूर्वीच प्रकल्पाला परवानग्या मिळाल्या आहेत.
- याचिकाकर्त्यांनी २०२१ साली याचिका दाखल केली, मात्र त्यास विलंब झाला.
- प्रकल्प पूर्णत्वाकडे आला आहे. आता त्यात हस्तक्षेप शक्य नाही.

सिडकोने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत खांदेश्वर, मानसरोवर, तळोजा, खारघर आणि वाशी या ठिकाणी २६ हजार घरे बांधण्याचा निर्णय घेतला. २०१९ मध्ये रीतसर निविदा काढली. आता इमारती जवळपास बांधून पूर्ण झाल्या असतानाच मानसरोवर आणि खांदेश्वर स्थानकालगत उभारण्यात आलेल्या इमारतींना व इतरांनी आक्षेप घेत हायकोर्टात ॲड. सचिन पुंदे यांच्यामार्फत याचिका दाखल केली. सिडकोने कांदळवनांच्या जागेवर इमारती उभारल्या असून त्याचा पर्यावरणावर वाईट याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिलासा देण्यास

CIDCO
WE MAKE CITIES

Newsband Sunday, 2 February 2025

# CIDCO takes action against unauthorized huts in Kharghar



By Chandrashekhar Hendve
@seashekhar

The City and Industrial Development Corporation (CIDCO) took action against unauthorized huts in Sector 36, Kharghar. A total of 30 to 35 unauthorized huts were demolished in a swift action led by Manoj Ghode Patil, CIDCO's Deputy Collector and Controller of Unauthorized Construction.

The demolition operation was carried out with the assistance of a JCB, two trucks, three jeeps, one supervisor, and a team of ten labourers, police, and security personnel. This action was part of CIDCO's ongoing efforts to curb illegal constructions in the region.

In a statement, Mr. Patil emphasized the importance of Kharghar as an educational city, home to a large population of educated citizens. He also highlighted that CIDCO is specifically targeting unauthorized huts.

Patil assured that CIDCO is committed to a special campaign against such encroachments and that greater attention would be paid to ensuring that these areas remain free from future illegal constructions.

CIDCO
WE MAKE CITIES

रविवार, दि. २ फेब्रुवारी २०२५ | सामना

## डिटेल इम्प्लिमेंटेशन प्लॅन आठवडाभरात प्रसिद्ध होणार

# मुहूर्त ठरला मे महिन्यात नवी मुंबईतून टेकऑफ

नवी मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर व्यावसायिक प्रवासी विमानाच्या लँडिंगची चाचणी यशस्वी झाल्यानंतर आता विमानतळ सुरू करण्याच्या हालचाली वेगात सुरू झाल्या आहेत. या विमानतळाचा डिटेल इम्प्लिमेंटेशन प्लॅन (सविस्तर अंमलबजावणी योजना) आठवडाभरात आंतरराष्ट्रीय मासिकात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर ७० दिवसांमध्ये नागरी विमान वाहतूक महासंचालकांकडून विमानतळ सुरू करण्याची परवानगी देण्यात येणार आहे. त्यानुसार येत्या मे महिन्यात नवी मुंबई विमानतळावरून विमानांचे टेकऑफ सुरू होणार आहे. एअर इंडिया आणि इंडिगोच्या पथकाने नुकतीच विमानतळाच्या साईटला भेट दिली आणि रन वे, टर्मिनल आणि सुविधांची पाहणी केली आहे. दरम्यान, मुंबईतील एअरपोर्टचे एक टर्मिनल येत्या ऑक्टोबरपासून बंद होणार असल्याने तेथील विमानांची वाहतूकही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर वळवण्यात येणार आहे.

■ सिग्नल यंत्रणा, रडार आणि पीआयपीएलची चाचणी यशस्वी झाल्यानंतर विमानतळ प्राधिकरणाने नवी मुंबई विमानतळावर २९ डिसेंबर २०२४ रोजी प्रत्यक्षात विमान उतरवण्याची चाचणी घेण्यात आली. इंडिगो ए ३२० या विमानाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर यशस्वी लँडिंग आणि टेकऑफही केले. त्यामुळे विमानतळ सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला.



■ अदानी समूह आणि नागरी हवाई प्राधिकरणाने विमानतळ सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियांना आता गती द्यायला सुरुवात केली आहे. विमानतळ सुरू करण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय मासिकामध्ये विमानतळाचा डिटेल इम्प्लिमेंटेशन प्लॅन (डीआयपी) प्रसिद्ध करण्यासाठी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. हा प्लॅन येत्या आठवडाभरात प्रसिद्ध होणार आहे.

### अधिकाऱ्यांचे पाहणी सत्र सुरूच राहणार

टेकऑफची तारीख जवळ येऊ लागल्यामुळे नवी मुंबई विमानतळावर अधिकाऱ्यांचे पाहणी सत्र सुरू झाले आहे. नुकतीच इंडिगोच्या एका पथकाने विमानतळाच्या साईटला भेट देऊन धावपट्टी आणि टर्मिनलसह अन्य सुविधांची पाहणी केली. या पथकामध्ये इंडिगो एअरलाईन्सची ऑपरेशन टीम, वैमानिक, अभियंता आणि केबिन क्रू आदींचा समावेश होता. इंडिगो एअरलाईन्सच्या पथकापूर्वी एअर इंडियाच्या पथकानेही नवी मुंबई विमानतळाची पाहणी केली आहे. अधिकाऱ्यांचे हे पाहणी सत्र आता सुरूच राहणार आहे, असे विमानतळ प्राधिकरणाच्या सूत्रांनी सांगितले.

### ऑक्टोबरपासून मुंबईचे डोमेस्टिक एअरपोर्ट बंद

मुंबईतील सांताक्रुझ येथील डोमेस्टिक एअरपोर्ट पुनर्विकासासाठी येत्या १ ऑक्टोबरपासून बंद ठेवण्यात येणार आहे. पुनर्विकासाचे काम सुमारे तीन ते साडेतीन वर्षे चालणार आहे. त्यामुळे या एअरपोर्टवरून होणारी काही विमानांची उड्डाणे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर वळवण्यात आली आहेत.

■ विमानतळ सुरू करण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय मासिकामध्ये विमानतळाचा डिटेल इम्प्लिमेंटेशन प्लॅन (डीआयपी) प्रसिद्ध करणे आवश्यक असते. हा डीआयपी प्रसिद्ध झाल्यानंतर ७० दिवसांमध्ये नागरी विमान वाहतूक महासंचालकांकडून विमानतळ सुरू करण्यास परवानगी दिली जाते.

CIDCO
WE MAKE CITIES

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 2 Feb 02, 202

# घरांची अनामत भरली

## 'सिडको महागृहनिर्माण', १५ फेब्रुवारीला सोडत

## योजनेला चांगला प्रतिसाद, २१ हजारांहून अधिक ग्राहकांकडून रकमेचा भरणा

कमलाकर कांबळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** माझे पसंतीचे सिडको घर योजनेला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या योजनेतील २६ हजार घरांसाठी २१ हजारांपेक्षा अधिक लोकांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. सध्या अर्जांची छाननी सुरू आहे. त्यानंतर १५ फेब्रुवारीला संगणकीय सोडत काढण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. या प्रकल्पांतील बहुतांशी घरे तयार असून, सोडतीनंतर अवघ्या काही महिन्यांत यशस्वी अर्जदारांना घरांचे वाटप केले जाणार आहे.

सिडको शहराच्या विविध नोडमधील २७ ठिकाणी ६७ हजार घरे बांधत आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ४३ हजार घरांना 'महारेरा'ची परवानगी प्राप्त झाली असून, त्यांचे बांधकामही प्रगतिपथावर आहे. त्यातील २६ हजार घरांची योजना ११ ऑक्टोबरला जाहीर झाली होती.




**२६ हजार**

सिडकोच्या माध्यमातून शहराच्या विविध नोडमधील २७ ठिकाणी ६७ हजार घरे बांधली जात आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ४३ हजार घरांना 'महारेरा'ची परवानगी प्राप्त झाली असून, त्यांचे बांधकामही प्रगतिपथावर आहे.

**घरांची योजना ११ ऑक्टोबरला जाहीर झाली.**

### प्रत्येकाचे घराचे स्वप्न सोडतीनंतर होणार पूर्ण

१ सिडकोच्या एकूण २६ हजार घरांसाठी जवळपास २१ हजार अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. प्रत्येक अर्जदाराने घराचे पंधरा पर्याय निवडले आहेत.

२ घरांच्या एकूण संख्येपेक्षा प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या कमी असल्याने संगणकीय सोडतीत यातील प्रत्येकाचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. छाननीत बाद ठरणाऱ्या अर्जदारांचा याला अपवाद असणार आहे.

### दीड लाख अर्जदारांनी केली ऑनलाईन नोंदणी

ऑनलाइन नोंदणीची अंतिम मुदत ३१ जानेवारीला संपली. या कालावधीत जवळपास दीड लाख अर्जदारांनी ऑनलाईन नोंदणी केली.

२१ हजारांपेक्षा अधिक अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. विशेष म्हणजे सिडकोची ही घरे महाग असल्याची ओरड केली होती. मात्र, आमची घरे स्वस्त असल्याचा दावा करून सिडकोने किमती कमी करण्यास नकार दिला होता.

### खारघरमधील घरांना नागरिकांकडून पसंती

१ १३ हजार घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी, तर उर्वरित १३ हजार घरे अल्प उत्पन्न गटासाठी आहेत. यातील सर्वाधिक म्हणजेच पन्नास टक्के घरे एकट्या तळोजा नोडमधील आहेत.

२ खांदेश्वर, मानसरोवर, तसेच खारकोपर आणि बामणडोंगरी वाशी आणि खारघर विभागातील घरांचा समावेश आहे. या योजनेतील खारघरमधील घरांना ग्राहकांनी अधिक पसंती दिल्याचे समजते.